**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

डॉ.मनोजकुमार मोतीचंद गांधी
२०२, गणेश अपार्टमेंटस् २४/३
एरंडवणे, कर्वे रोड, पुणे - ४११ ००४

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
प्रभारी प्राचार्य,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती, ता. बारामती, जि.पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
रजिस्ट्रार,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७२, १७३,१७४, १७५<br>६६४,६७९,६८०,६८१,६८२,६८३,<br>६८४,६८५ व ७४०/ पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | अपील क्र. १७२,दि.२६.०३.२००६<br>अपील क्र.१७३, दि.२२.०३.२००६<br>अपील क्र.१७४, दि.२६.१२.२००५<br>अपील क्र.१७५, दि.२१.०३.२००६<br>अपील क्र.६६४,दि.०६.१०.२००६<br>अपील क्र.६७९,दि.२८.०९.२००६<br>अपील क्र.६८०,दि.०३.१०.२००६<br>अपील क्र.६८१,दि.०४.१०.२००६<br>अपील क्र.६८२,दि.०५.१०.२००६<br>अपील क्र.६८३,दि.२७.०९.२००६<br>अपील क्र.६८४,दि.१७.१०.२००६<br>अपील क्र.६८५, दि.२९.०९.२००६ |

| | | |
|---|---|---|
| | | अपील क्र.७४०,दि.०२.१२.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | अपील क्र.१७२,दि.०४.०४.२००६<br>अपील क्र१७३,दि.१८.०४.२००६<br>अपील क्र.१७४,दि.२८.०२.२००६<br>अपील क्र.१७५, दि.२१.१२.२००६ व दि.२०.०१.२००७<br>अपील क्र. ६६४, दि.२०.१२.२००६<br>अपील क्र. ६६९, दि.२०.१२.२००६<br>अपील क्र.६८०, दि.२०.१२.२००६<br>अपील क्र.६८१, दि.<br>अपील क्र.६८२, दि.२५.०१.२००७ व ०४.०४.२००७<br>अपील क्र. ६८३<br>अपील क्र.६८४, दि.०२.०२.२००७<br>अपील क्र. ६८५, दि.०५.०४.२००७<br>अपील क्र. ७४०, दि.०२.०३.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | अपील क्र.१७२, दि.२५.०५.२००६<br>अपील क्र.१७३, दि.१७.०५.२००६<br>अपील क्र. १७४, दि.२०.०५.२००६<br>अपील क्र.१७५, दि.२४.०५.२००६<br>अपील क्र.६६४, दि.३०.११.२००६<br>अपील क्र.६७९, दि.२२.११.२००६<br>अपील क्र. ६८०, दि.२७.११.२००६<br>अपील क्र. ६८१, दि.२८.११.२००६<br>अपील क्र.६८२, दि.२९.११.२००६<br>अपील क्र.६८३, दि.२१.११.२००६<br>अपील क्र. ६८४, दि.०१.१२.२००६<br>अपील क्र. ६८५, दि.२३.११.२००६<br>अपील क्र.७४०, दि.३०.१२.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | अपील क्र.१७२, दि.<br>अपील क्र.१७३, दि. २३.०६.२००६<br>अपील क्र.१७४, दि. २३.०६.२००६<br>अपील क्र.१७५, दि.<br>अपील क्र.६६४, दि. ०३.०१.२००७<br>अपील क्र.६७९, दि. ०३.०१.२००७<br>अपील क्र.६८०, दि. ०३.०१.२००७<br>अपील क्र.६८१, दि. ०३.०१.२००७ |

| | | |
|---|---|---|
| | | अपील क्र. ६८२, दि. ०३.०१.२००७<br>अपील क्र.६८३, दि. ०३.०१.२००७<br>अपील क्र.६८४, दि. ०३.०१.२००७<br>अपील क्र.६८५, दि. ०३.०१.२००७<br>अपील क्र.७४०, दि. |

## विवेचन

अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय परिसर, बारामती, ता. बारामती, जि.पुणे ही संस्था व अपीलकर्ता डॉ.मनोजकुमार मोतीचंद गांधी यांच्यातील वादाच्या पार्श्वभूमीवर डॉ.गांधी यांनी माहितीच्या अधिकाराखाली वरील अर्ज व अपिले केली आहेत. अशा प्रकारचे मोठ्या प्रमाणावरील अर्ज व अपिले याबाबत आयोगाने उभय बाजूंना जाणीव देऊन एकत्रित विचारविनिमय करण्यास सुचविले होते.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय परिसर, बारामती, ता. बारामती, जि.पुणे या संस्थेने अपीलकर्त्याबरोबर दि.११.०४.२००८ रोजी चर्चा केली. मतभेदाच्या मुद्यांबाबत उभय बाजूंमध्ये एकमत झाले व सन्माननीय तडजोड झाली, असे पत्र क्र.एईएस/१८, दि.१५.०४.२००८ अन्वये संस्थेने कळविले. सदर तडजोडीमुळे वरील सर्व अपिले आपण मागे घेत असल्याचे अपीलकर्त्याने दि.२२.०४.२००८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १६.०५.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:१७३ /सातारा/२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :डॉ.दिलीप सीताराम देशपांडे<br>मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :उपविभागीय अधिकारी, फलटण, जि.सातारा |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :अपर जिल्हाधिकारी, सातारा, जि.सातारा |

दि.१८.३.२००८ रोजी अपीलकर्ते गैरहजर होते. अपिलकर्त्यांनी माजी आमदार यांच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाबाबत व तद्अनुषंगिक इतर बाबींबाबत अपिलात मागणी केली आहे व सदर विषय हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२.५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७९ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्रीमंती सुशिला ऊर्फ कमल जयवंत सातपुते<br>रा. ६१५-बी वॉर्ड, सुभाषनगर,<br>पाण्याचे टाकीमागे, कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी पन्हाळा नगरपरिषद, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त (सामान्य प्रशासन विभाग) पुणे विभाग, पुणे |

अपीलकर्त्यास माहिती मिळाली असल्याचे वरील तीनही घटकांनी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २६ .५.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

१८ **राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महादेव रामचंद्र बनछोडे
१०७२, ड वॉर्ड, शुक्रवार पेठ,
तेली गल्ली, कोल्हापूर, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,
जिल्हा कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८ / कोल्हापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महादेव रामचंद्र बनछोडे
१०७२, ड वॉर्ड, शुक्रवार पेठ, तेली गल्ली, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,
जिल्हा कोल्हापूर श्री.कुणालकुमार

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर श्री.विजय कुमार राम गोस्वामी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.१०.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.४.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.५.२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | (अ)आयुक्तांची नोटीस दि.१८.१.२००२ प्रमाणे रस्ता रुंदीकरिता १५.६१ चौ.मी.बाधित जागा आहे. उत्तरेकडील बाधित जागेचे टाऊन डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्युलेशन फॉर कोल्हापूर म्युनिसिपल कॉर्पोरेशन नं.टीपीएस/२१९२/२३६८/सीआर१३५/९२/युडी-१३, दि.१५.११.१८९९ अन्वये बाधित जागेचे रेखांकन करुन लांबी रुंदीसह चौ.मी. मध्ये नमूद करुन मिळावे.<br>(ब)सदर जागेच्या दक्षिणेकडील जागा १९४०-५० चे दशकात भंगी पॅसेजसाठी त्यावेळच्या नगरपालिकेने जे.पी.नाईक नगररचना नावाने उल्लेखित नगररचना प्लॅन अंतर्गत मनमानी तऱ्हेने आपल्या कब्जास घेतली आहे. सदर प्लॅनप्रमाणे माझे ५ फूट जागा दक्षिणोत्तर जाते. (त्याची किंमतही आम्हांस दिली नाही). पण सदर भंगी बोळासाठी घेतलेली जागा अजूनही माझे नकाशात दाखविली जाते. पण वरील नंबरचे स्कीमप्रमाणे किती जागा बाधित होती हे वरीलप्रमाणे जोडलेल्या माझे मिळकतीचे दक्षिणेकडील नकाशात रेखांकित करुन मिळावे आणि प्रत्यक्ष कब्जात घेतलेल्या जागेचे क्षेत्रफळ लांबी रुंदीसह नमूद करुन मिळावे. |

## विवेचन

आपल्या मिळकतीतील बाधित जागेचे नकाशावर रेखांकन करुन मिळावे व सन १९४० ते १९५० या दशकात नगररचना विकास आराखड्यात त्यावेळच्या नगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या जागेचे क्षेत्रफळ नमूद करुन मिळावे. तसेच तेव्हा मोबदला दिला नसल्याने तो द्यावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.महादेव रामचंद्र बनछोडे यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने श्रीःबनछोडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. मिळकतीचे रेखांकन करणे हे माहितीच्या अधिकारामध्ये अभिप्रेत नाही, असे नमूद करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री.बनछोडे यांचे अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री.बनछोडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सन १९४८ सालापूर्वीची कब्जेपट्टीबाबतच्या माहित्तीची दप्तरी नोंद नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी श्री.बनछोडे यांना कळविले. तसेच त्यावेळी नगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या जागेची नुकसानभरपाई मिळावी व रस्तारुंदीकरिता आता घेतलेल्या जागेचा तपशील नकाशावर रेखांकन करुन मिळावा, या दोन्ही मागण्या कार्यवाहीच्या असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत त्याचा समावेश होत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार राम गोस्वामी व अपिलीय प्राधिकारी श्री.कुणालकुमार यांनी केले. आपल्याला कळविलेल्या जागेचा तपशील प्रत्येक वेळी वेगवेगळा दिला आहे, तसेच घराच्या मागील बाजूच्या ताब्यात घेतलेल्या प्रत्यक्ष जागेचे मोजमाप घेतलेले नाही, असे निवेदन श्री.बनछोडे यांनी केले. परंतु रस्तारुंदीसाठी अद्याप जागेचा ताबाच घेतलेला नसल्यामुळे नेमका तपशील देता येणार नाही. जागा ताब्यात घेऊ, तेव्हा नेमकी जागा कळवू असे निवेदन जन माहिती अधिकारी श्री.विजय कुमार गोस्वामी व अपिलीय प्राधिकारी श्री.कुणालकुमार यांनी केले.

माहितीच्या नेमकेपणाच्या दृष्टीने नेमकी किती जागा ताब्यात घेणार, हा तपशील श्री.बनछोडे याना मिळावा यासाठी श्री.बनछोडे यांच्या मालकीच्या जागेतील समक्ष मोजमापे घेऊन तपशील श्री.बनछोडे यांना द्यावा, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार प्रस्तावित विकास योजनेतील रस्तारुंदीने बाधित होणाऱ्या क्षेत्राची श्री.बनछोडे यांच्या समक्ष मोजमापे घेऊन तपशील त्यांना दिल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संालक, नगररचना, कोल्हापूर महानगरपालिका यांनी दि.२५.१०.२००७ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले. परंतु बनावट कागदपत्रांच्या आधारे ही मोजमापे झाल्याने ती आपल्याला मान्य नसल्याचे श्री.बनछोडे यांनी दि.२७.१०.२००७ च्या पत्राने आयोगाला कळविले. मात्र उभय बाजूंमधील वाद, कागदपत्रांचा खरेखोटेपणा, बाधित जागेची नुकसानभरपाई आदी विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. त्यामुळे आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ६.५.२००८

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ,पुणे खंडपीठ

क्रमांक : अपील-१८४/सातारा/२००६

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉल समोर, पुणे -१
दुरध्वी क्रमांक २६०५०६३२
फॅक्स क्रमांक : २६०५०६३२
दिांक : २२.०५.२००८

प्रति,

श्री. विष्णू किसन पाटील,
प्लॉट नं.२०५, मंगळवार पेठ,
ता.कराड, जि.पुणे

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५**
**कलम १९ (३) अन्वये दाखल केलेले अपील**

संदर्भ :- आपला द्वितीय अपील (क्रमांक १८४/सातारा), दि.११.०३.२००६ अर्ज

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपण राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे संदर्भाधीन अपील दाखल केले आहे.

आपण दि.२७.०९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील क्रमांक ११३/सातारा हे अपील दि.१८.०३.२००८ च्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमात अंतभूर्त होते सदर अपील निकाली काढल्याबाबत या कार्यालयाने दि.०५.०५.२००८ च्या पत्रान्वये आपणास कळविलेले आहे. सदर अपील (क्रमांक १८४/सातारा) मध्ये नमूद केलेला विषय ~~[illegible]~~ माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नसल्याने मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ,पुणे खंडपीठ यांचे निदेशानुसार सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

आपला,

(signature)

( य. ह. देशपांडे )
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

२३/५/०८
निर्गमित केल्याचा दिनांक
व स्वाक्षरी

का. ५
आवेर १
२२-५-०८

प्रत : जन माहिती अधिकारी, उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे विभाग, पुणे प्रदेश, जेल रोड, पुणे-६

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सांगली येथे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १४.५.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५ / सांगली १८५ |
| २ | अपीलकर्ता | श्री. रघुनाथ केशव देशपांडे<br>मु. पोः कडेगाव ता. कडेगाव, जि. सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत कडेगाव, ता. कडेगांव जि. सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी<br>पंचायत समिती कडेगांव, ता. कडेगाव, जि. सांगली |

प्रस्तुत अपीलकर्त्याचे निधन झाल्याने ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कडेगाव, जि. सांगली यांनी दि. १५.१०.२००७ रोजी दिला दिलेला मृत्यू दाखला पहाता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २२.५.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**